**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४चं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार वितरण, राज्याला सहा पुरस्कार
- सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीला आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरुवात, प्रधानमंत्री विद्यार्थ्यांशी साधणार संवाद
- महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याची रेल्वेमंत्र्यांची लोकसभेत माहिती
- संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण संस्थेचा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना जाहीर

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, पर्थ इथं सुरु असलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी २९९ धावांचं आव्हान

**<><><><><>**

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४चं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं होणार आहे. या वर्षी, विविध श्रेणींमध्ये एकंदर ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये राज्याला सहा पुरस्कार मिळाले आहेत.

यामध्ये सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरलंय.

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे

भंडारा जिल्ह्यातल्या बेला ग्रामपंचायतीनं कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.

**<><><><><>**

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. यात राज्यातल्या चार केंद्रांचा समावेश आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दूरस्थ माध्यमातून याचं  उदघाटन केलं. देशातले विद्यार्थी हेच विकसित भारताचे चालक असल्याचं प्रधान यांनी यावेळी सांगितलं. युवावर्गाची बुद्धिमत्ता, व्हिजन, मेहनत, उत्साह, नेतृत्वगुण आणि नवोन्मेष यामुळे २१ व्या शतकातली ज्ञानाधारित अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय होईल आणि अनेक विकसनशील देशांसाठी ते आदर्श विकास प्रारूप ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आज होत असलेल्या अंतिम फेरीत महाराष्ट्रातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधल्या सुमारे तेराशे विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यात मुंबईतल्या वेलिंगकर संस्थेतले ३४ संघ गृह मंत्रालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सहा समस्यांचं निराकरण

करण्यासाठी काम करत आहेत. याविषयी केंद्रप्रमुख निलेश लेले यांनी माहिती दिली.

**होल्ड बाईट - निलेश लेले**

**<><><><><>**

केंद्र सरकार आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर नियंत्रण आणणारा कायदा करण्याच्या विचाराधीन असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशात एक व्यापक भारत एआय मिशन सुरू करण्यात आलं असून, त्यात एआय कंप्युट सुविधा निर्माण करणं, कौशल्य फ्रेमवर्क, स्टार्ट-अप्ससाठी वित्तपुरवठा, इनोव्हेशन सेंटर, डेटासेट प्लॅटफॉर्म तयार करणं आणि नवीन ॲप्लिकेशन तयार करणं यावर भर असेल  यासंदर्भात अन्य एका प्रश्नावर उत्तर देताना वैष्णव यांनी, छत्रपती संभाजीनगर इथं कृत्रिम ॲप्लिकेशनचं काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यामुळे सेमी कंडक्टर उद्योगासह शेती उत्पादनाला देखील चालना मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी यासंदर्भातला प्रश्न उपस्थित केला होता.

**<><><><><>**

महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. पुण्याहून रेल्वे मार्गाचं दुहेरीकरण तसंच तिहेरीकरणाचं काम

सुरु असून, रेल्वेचं जाळं मोठ्या प्रमाणात विस्तारण्यात येणार आहे. त्यानंतर रेल्वे थांबे वाढवण्यात येणार असल्याचं वैष्णव म्हणाले. राज्यात रेल्वेशी संबंधित कामं योग्य रितीने सुरू असल्याचं सुळे यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे २६वे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांनी आज पदभार स्वीकारला. संजय मल्होत्रा हे भारतीय प्रशासकीय सेवेतले राजस्थान केडरचे १९९० सालचे अधिकारी असून, ते अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर कार्यरत होते.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्यांना तसंच, जागतिक हवामान बदल, दुष्काळ आणि जमिनीचा खालावत चाललेला दर्जा याविरोधात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या महिला संघांमध्ये आज पर्थ इथं सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी २९९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून यजमान ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. ऑस्ट्रेलियानं निर्धारित ५० षटकात ६ गडी गमावून २९८ धावा केल्या. एनाबेला

सिदरलँडच्या ११० धावांच्या तडाखेबंद खेळीमुळे ऑस्ट्रेलियाला ही मजल गाठता आली. भारतातर्फे रेड्डीनं चार तर दीप्ती शर्मानं एक गडी बाद केला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ११ षटकांत १ बाद ५५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

परभणी शहरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतीची अवहेलना केल्यामुळे आंबेडकरी अनुयायांनी केलेलं आंदोलन आज तीव्र झालं. आंबेडकरी संघटनांकडून परभणी बंदची हाक देण्यात आली तसंच ठिकठिकाणी रास्तारोको करण्यात आला. काही ठिकाणी दगडफेक आणि दुकानाची मोडतोड झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
परभणीत कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी शांततेचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा सरचिटणीस आस्वाद पाटील यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. आस्वाद पाटील हे शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे भाचे आणि माजी मंत्री दिवंगत मिनाक्षी पाटील यांचे पुत्र आहेत. आस्वाद पाटील यांच्यासोबत पक्षाचे अनेक कार्यकर्ते बाहेर पडणार असल्याचं सांगितलं जात आहे. विधानसभा निवडणुकीत त्यांना शेकापकडून उमेदवारीची इच्छा होती, मात्र पक्षाने चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी दिल्यानं ते नाराज होते असं आता सांगितलं जात आहे.

<><><><><>

मुंबईतल्या कुर्ला बस अपघाताची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई इलेक्ट्रिक वाहतूक परिवहन मंडळानं चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. चालकानं सुरक्षा नियमांच पालन केलं होतं की नाही किंवा बसमध्ये काही तांत्रिक बिघाड होता यासंदर्भातील चौकशी ही समिती करेल. सोमवारी झालेल्या या अपघातात ४२ जण जखमी झाले आणि ७ जणांचा मृत्यू झाला होता.

**<><><><><>**

यवतमाळमध्ये एका भरधाव कारनं भाजी विक्रेते आणि दुचाकीस्वारांना उडवलं. या अपघातात तिघे जण गंभीर जखमी झाले. आर्णी रोडवर ही दुर्घटना घडली, यात पाच ते सहा लोक जखमी झाले. नागरिकांनी अपघातस्थळी धाव घेत जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल केलं.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्याबाहेरून अवैधरित्या सागवान आणून त्याची विक्री होत असल्याच्या माहितीवरून वनविभागानं छापे टाकले. या लाकडाची किंमत 3 लाख रुपये इतकी आहे. वनविभागाच्या वतीनं अधिक तपास सुरू आहे.

**//<><><><><>//**